JKS

SHIKSHAN SAMITI K.I. NESARI'S

# TUKARAM KRISHNAJI KOLEKAR ARTS AND COMMERCE COLLEGE, NESARI

At/post Nesari Tal. Gadhinglaj. Dist: Kolhapur, Maharashtra, India.

G R N: NGC 3595/NMV/137/95 MS -3 Date: 4/8/1995

Phone: 02327-272591
E-mail: tkacnesari08@rediffmail.com

President
Adv. H.T. Kolekar (B.Sc. L.L.B)

I/C Principal
Dr.S.B. Bhambar M.A.M. Phil Ph.D

O.NO: TKKACN/2022-23

Date – 25/05/2023

## MINI PROJECT REPORT

A Mini Project was undertaken for the students of the college under student centric method. For that B. A. Part-3 Sociology students were selected. A total of 10 students participated in this. The list of students and photos are attached with the Mini Project. The students have collected information about the project by making direct visits on the topic **THE ROLE OF FEMALE MEMBERS IN GRAMPANCHAYAT AND OBSTACLES IN VILLAGE DEVELOPMENT: SPECIAL REFERENCE TO GADHINGLAJ TALUKA.** It took about two months for this and the information collected by the students is fully up to the test of research. The students have completed this mini project under the guidance of **Shri. Jagdeesh Sasane** and for this the Head of Department of Sociology **Dr. Vijay Musai** and College Principal **Hon. Dr. S.B. Bhambar** has received support.

(Shri. Sasane J. K.)

PRINCIPAL
Tukaram Krishnaji Kolekar
Arts & Commerce College, Nesari,
Tal. Gadhinglaj, Dist. Kolhapur

शिक्षण समिती कसबा नेसरीचे

## तु. कृ. कोलेकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नेसरी

समाजशास्त्र विभाग - २०२२-२३

लघुप्रकल्पाचे नाव

# 'ग्रामपंचायतीतील महिला सदस्यांची भूमिका आणि ग्रामविकासातील अडथळे: विशेष संदर्भ गडहिंग्लज तालुका'

संशोधक विद्यार्थी

बी. ए. भाग तीन (समाजशास्त्र विभाग) - २०२२-२३

: प्रमुख मार्गदर्शक :

प्रा. ससाणे जगदीश केशवराव (समाजशास्त्र विभाग)

: समाजशास्त्र विभागप्रमुख :

डॉ. विजय बी. मुसाई

T. K. Kolekar ... Commerce College ... Estd 1995 ... Gadhinglaj ... Nesari

### T. K. KOLEKAR ARTS, COMMERCE AND SCIENCE COLLEGE, NESARI

### DEPARTMENT OF SOCIOLOGY- 2022-23

### MINIPROJECT ON

# THE ROLE OF FEMALE MEMBERS IN GRAMPANCHAYAT AND OBSTACLES IN VILLEGE DEVELOPMENT: SPECIAL REFERENCE TO GADHINGLAJ TALUKA

## PARTICIPANT STUDENTS – B. A. III



BAGADI SHRINATH SHANKAR



HEBBALKAR NEHA PANDURANG



PATIL SWAPNALI VISHNU



DALAVI SHUBHANGI DEVAJI



LOHAR NIKITA SURESH



KAMBLE SHRAVAN PANDURANG



KAMBLE ASMIT ANANDA



SUTAR SAMPADA NARAYAN



PATIL ASHWINI ASHOK



FAGARE DIPAK BABU

J. K. Kolekar Arts & Commerce College, Nesari
Estd 1995
Gadhinglaj

# समाजशास्त्र विभाग - २०२२-२३

## लघुप्रकल्प संशोधक विद्यार्थी व मार्गदर्शक



Kolekar Arts & Commerce College
Estd
Gadhinglaj

# प्रतिज्ञापत्र

आम्ही खाली सह्या करणारे बी. ए. भाग ३ समाजशास्त्र (२०२२-२३) चे विद्यार्थी असे नमूद करतो कि, आम्ही तयार केलेला 'ग्रामपंचायतीतील महिला सदस्यांची भूमिका आणि ग्रामविकासातील अडथळे: विशेष संदर्भ गडहिंग्लज तालुका' लघुप्रकल्प हा पूर्णतः आमचा असून त्याची कुठलीही नक्कल केलेली नाही. तसेच हा लघुप्रकल्प पूर्णतः समाजशास्त्रातील सर्वेक्षण आणि क्षेत्रकार्यपद्धतीवर आधारित आहे. हा प्रकल्प करताना आम्ही प्रत्यक्ष आवश्यक त्या ग्रामपंचायतीला भेटी देऊन तसेच मुलाखतीचा अवलंब करून माहिती गोळा केली असून त्याची उद्दिष्ट्ये, विश्लेषण, सारणी रचना, प्रतिमा तसेच निष्कर्ष आणि इतर रचनात्मक वैशिष्ट्ये आमचे मार्गदर्शक प्रा. जगदीश केशवराव ससाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे.

| अ.क्र. | प्रकल्प संशोधकाचे नाव | सही |
|---|---|---|
| १ | बागडी श्रीनाथ शंकर | [signature] |
| २ | दळवी शुभांगी देवाजी | SDDalavi |
| ३ | फगरे दीपक बाबू | [signature] |
| ४ | हेब्बाळकर नेहा पांडुरंग | [signature] |
| ५ | कांबळे अस्मित आनंदा | [illegible].A.Kamble |
| ६ | कांबळे श्रावण पांडुरंग | [signature] |
| ७ | लोहार निकिता सुरेश | N.S.lohde |
| ८ | पाटील अश्विनी अशोक | [signature] |
| ९ | पाटील स्वप्नाली विष्णू | S.V.Patil |
| १० | सुतार संपदा नारायण | S.N.Sutar |

J K Kolekar Arts & Commerce College, Nesari Estd 1995

# ऋणनिर्देश

**महाविद्‌यालयातील समाजशास्त्र विभागातील बी. ए. भाग तीन मधील विद्‌यार्थ्यांनी** 'ग्रामपंचायतीतील महिला सदस्यांची भूमिका आणि ग्रामविकासातील अडथळे: विशेष संदर्भ गडहिंग्लज तालुका' या विषयावर लघुप्रकल्प प्रस्तुत केला आहे. यासाठी शिक्षण समिती कसबा नेसरी अध्यक्ष मा. हेमंत कोलेकर, संस्थेचे सचिव मा. डॉ. अर्चनाताई हेमं त कोलेकार तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी यांच्या सहकार्यातून हा लघुप्रकल्प पूर्ण झाला असे म्हणता येईल. महाविद्‌यालयाचे प्राचार्य मा. डॉ. एस. बी. भांबर यांनी आम्हाला हा लघुप्रकल्प पूर्ण करण्यासाठी केलेले मार्गदर्शन आणि उपलब्ध करून दिलेल्या सोयी-सवलती यामुळे हा प्रकल्प वेळेत पूर्ण करू शकलो त्यामुळे त्यांचे विशेष आभार. समाजशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. व्ही. बी. मुसाई यांचेही मार्गदर्शन आणि पाठबळ हे आम्हा विद्‌यार्थ्यांना कायमच प्रोत्साहित करणारे आहे त्यामुळे त्यांचेही आभार. निवडक ग्रामपंचायतीचे सरपंच उपसरपंच आणि सदस्य तसेच निवडक ग्रामपंचायती अंतर्गत येणारे ग्रामस्थ यांचे मोलाचे सहकार्य लाभले त्यामुळे त्यांचे मनःपूर्वक आभार. तसेच हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी बिद्रेवाडी गावातील प्राध्यापक श्री. अनिल गुरव आणि दै. सकाळचे नेसरीतील वार्ताहर आणि आमचे महाविद्‌यालयाचे सेवक श्री. दिनकर पाटील यांनी उपलब्ध करून दिलेल्या माहितीच्या आधारे आमचा प्रकल्प पूर्ण झाला आहे त्यामुळे त्यांचेही आभार. लघुप्रकल्पाचे प्रमुख मार्गदर्शक आणि समाजशास्त्र विषयाचे शिक्षक श्री. जे. के. ससाणे यांनी संशोधनातील बारकावे, तथ्य संकलन, विश्लेषण ई. बाबींचे केलेले मार्गदर्शन यामुळेच हा लघुप्रकल्प पूर्ण झाला त्यामुळे त्यांचे मनःपूर्वक आभार. तसेच महाविद्‌यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या पाठबळामुळे हा लघुप्रकल्प पूर्ण झाला असे आम्ही समजतो. त्यामुळे सर्वांचे खूप-खूप आभार.

**लघुप्रकल्प संशोधक विद्‌यार्थी (समाजशास्त्र विभाग)**

J K Kolekar Arts & Commerce College, Nesari
Estd 1995
Gadhinglaj

# ग्रामपंचायतीतील महिला सदस्यांची भूमिका आणि ग्रामविकासातील अडथळे: विशेष संदर्भ गडहिंग्लज तालुका

## प्रस्तावना

स्त्रियांना समान अधिकार या नात्याने महाराष्ट्रात प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांना समान अधिकार देण्यात येत आहेत. सनदशीर मार्गाने त्यांना अधिकाधिक अधिकार प्रदान करण्यात महाराष्ट्र कायमच अग्रेसर राहिला आहे. महाराष्ट्राला स्वातंत्र्यानंतर राज्यघटनेने स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने सर्व अधिकार दिले आहेत. राजकीय क्षेत्रही त्याला अपवाद नाही. महिला आरक्षणाचा मुद्दा संविधान सभेच्या चर्चेतही आला होता, पण तो अनावश्यक असल्याने फेटाळला गेला. असे गृहीत धरले गेले की लोकशाही सर्व गटांना प्रतिनिधित्व देईल. संविधानातील ७३ व्या आणि ७४ व्या दुरूस्तीचा ऐतिहासिक कायदा करण्याचा मार्ग मोकळा झाला. ज्यामध्ये सर्व राज्य सरकारांना पंचायती राज संस्थांमध्ये महिलांसाठी एक तृतीयांश जागा आणि सर्व स्तरावरील अध्यक्षांच्या कार्यालयांमध्ये एक तृतीयांश जागा राखीव ठेवण्याचा आदेश देण्यात आला आहे. पंचायती राज संस्था आणि शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एक तृतीयांश जागा अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी राखीव आहेत. २०१४ मध्ये, भाजपने आपल्या जाहीरनाम्यात महिलांसाठी 33% आरक्षणाचे वचन दिले होते आणि २०१९ च्या अजेंड्यात या वचनाची पुनरावृत्ती केली. मात्र याबाबत शासनाकडून कोणतीही हालचाल झालेली नाही. ग्रामपंचायती या गाव पातळीवरील स्थानिक स्वराज्य संस्था आहेत. ते पंचायतीराजचे कोनशिला आहेत. पाचशेहून अधिक लोकसंख्या असलेल्या गावात ग्रामपंचायत स्थापन करता येते. या गावांची लोकसंख्या पाचशेपेक्षा कमी असल्यास दोन किंवा अधिक गावांसाठी एक सामाईक ग्रामपंचायत असते, तेव्हा तिला गट-ग्रामपंचायत म्हणतात. पंचायत सदस्य गावातील मतदारांद्वारे निवडले जातात परंतु जागा

वेगवेगळ्या प्रवर्गासाठी राखीव असतात. ३३% जागा महिलांसाठी राखीव आहेत. अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), आणि इतर मागासवर्गीय (OBC) यांना गावात त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागा वाटप केल्या जातात. पदाधिकारी पदे (सरपंच आणि उपसरपंच पदे) महिला, SC, ST अशा विविध लोकसंख्येमध्ये फिरवली जातात.

कोल्हापूर जिल्ह्यात एकूण १२ तालुके आहेत. तर कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज तालुक्यात एकूण ९२ खेडी असून लोकसंखेच्या प्रमाणात ग्रामपंचायती आहेत. यातील काही ग्रामपंचायती ग्रुप ग्रामपंचायती आहेत. गडहिंग्लज तालुक्यातील एकूण गावामधून निवडक ग्रामपंचायती व त्यात महिलांचे संख्याबळ, तसेच बिनविरोध ग्रामपंचायती, महिला सरपंच तसेच त्यांच्या पुढील आव्हाने यांचे अध्ययन करण्यात आहे. संशोधनासाठी गडहिंग्लज तालुक्यातील १८ ग्रामपंचायती निवडल्या आहेत. प्रस्तुत शोधनिबंध २०२२-२३ या वर्षातील माहिती संकलनावर आधारित आहे. तसेच हि माहिती संकलित करण्यामध्ये आमच्या महाविद्यालयाचे प्रशासकीय सेवक श्री. दिनकर पाटील(सकाळ बातमीदार, तारेवाडी) व प्रा. अनिल गुरव (बिद्रेवाडी) यांचेही मोलाचे सहकार्य तसेच इतर घटकांचेही सहकार्य लाभले आहे.

# उद्देश

**प्रस्तुत शोधनिबंधात पुढील उद्देशांचा समावेश करण्यात आला आहे.**

१. गडहिंग्लज तालुक्यातील निवडक ग्रामपंचायतीचे अध्ययन करणे.

२. ग्रामपंचायतीतील महिला सरपंचासमोरील अडचणी व आव्हाने अभ्यासणे.

३. ग्रामपंचायत महिला सदस्यासमोरील अडचणी व समस्या अभ्यासणे.

# गृहीतकृत्ये

**प्रस्तुत शोधनिबंधात पुढील गृहीतकृत्यांचा समावेश करण्यात आला आहे.**

१. निवडलेल्या ग्रामपंचायतीत महिलांचे संख्याबळ योग्य आहे.

२. लिंगभेदाला ग्रामपंचायतीत महिलांना सामोरे जावे लागते.

३. अपुऱ्या निधीमुळे ग्रामपंचायत महिला प्रतिनिधीना विकास कामे करताना अनेक अडचणींना येतात.

# संशोधनपद्धती

शोधनिबंधात तथ्यसंकलानातील पुढील प्राथमिक स्त्रोत व द्वितीयक स्त्रोतांचा समावेश करण्यात आला आहे.

प्राथमिक स्त्रोत- प्राथमिक संकलनात प्रामुख्याने गडहिंग्लज तालुक्यातील निवडलेल्या दहा ग्रामपंचायतीला, महिला सरपंचाला, ग्रामपंचायत महिला सदस्यांना तसेच निवडलेल्या गावातील काही लोकांशी प्रत्यक्ष भेट देऊन, ओपचारिक व अनौपचारिक चर्चा करून तसेच प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती संकलित करण्यात आली आहे. संकलित केलेली माहिती कुठे प्रसारित न करता, तसेच त्याचा गैरवापर केला गेला नाही, तसेच गोळा केलेली माहिती अत्यंत गुप्त ठेवण्यात आली आहे.

द्वितीय स्त्रोत- द्वितीयक स्त्रोतात न्यूजपेपर, मासिके, साप्ताहिके, सोसीअल मिडिया, संदर्भग्रंथ ई. चा उपयोग संशोधन अधिकाधिक शास्त्रीय व दर्जेदार होण्याच्या अनुषंगाने उपयोग करण्यात आला आहे.

## व्याप्ती

प्रस्तुत शोधनिबंधाची व्याप्ती हि कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज तालुक्यातील निवडक १८ ग्रामपंचायतीपुरती मर्यादित आहे. तसेच गडहिंग्लज तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीचा अभ्यास करणे खूप वेळ खाणारे आणि खर्चिक असल्याने तसेच अध्यानाचे क्षेत्र खूप व्यापक झाले असते म्हणून तालुक्यातील फक्त १८ ग्रामपंचायती निवडल्या आहेत, जेणे करून संशोधन, व अध्ययन करणे अधिक सोपे होईल. तसेच शोधनिबंधातील निष्कर्ष इतर ग्रामपंचायतीस कमी अधिक प्रमाणात लागू पडतील.

## विश्लेषण

राज्यघटनेतील ७३ व्या आणि ७४ व्या घटना दुरुस्तीने महत्वपूर्ण बदल घडवून आणले आहेत जे समान प्रवेशास प्रोत्साहन देतात आणि राजकारणात महिलांचा सहभाग वाढवतात. एकूण मतदारसंघांपैकी एक तृतीयांश मतदारसंघ महिलांसाठी राखीव आहेत. हे सार्वजनिक जीवनात महिलांचा सहभाग सुनिश्चित करते आणि वाढवते. पायाभूत स्तरावर महिलांसाठी राष्ट्रीय धोरण साध्य करण्यासाठी ते प्रयत्नशील आहे. पंचायती राज संस्थांमध्ये आरक्षण प्रणाली सुरू केल्याने महिलांचे सक्षमीकरण होते आणि समाजात महिलांची आर्थिक, सामाजिक आणि राजकीय स्थिती उंचावते. हे पारंपारिकपणे पुरुषप्रधान समाजापासून उदारीकरण सक्षम करते आणि सुशासनात नवीन दृष्टीकोन आणते. आरक्षण प्रणाली राजकीय चौकटीत महिलांच्या सहभागास प्रोत्साहन देते. यामुळे शिक्षण, आरोग्य, कौटुंबिक उत्पन्न वाढीमध्ये काही सकारात्मक परिणाम आणि चांगले परिणाम दिसून आले आहेत. ग्रामपंचायत मग ती कोणतीही असो, आज त्यात महिला मोठ्या प्रमाणात संधी मिळत आहे. केवळ ग्रामपंचायत सदस्य म्हणून नाही तर सरपंचपदाचा मानही त्यांना मिळत असून त्या अत्यंत जबाबदारीने आणि पूर्ण कार्यक्षमतेने कार्य करत आहेत. शोधनिबंधासाठी निवडलेल्या १८ ग्रामपंचायतीचा अभ्यास करण्यापूर्वी प्रत्येक गावाची लोकसंख्या पाहणे गरजेचे आहे.

## गडहिंग्लज तालुक्यातील निवडक ग्रामपंचायतीअंतर्गत लोकसंख्या

| अनु.क्र. | ग्रामपंचायत | एकूण लोकसंख्या | पुरुष | स्त्री |
|---|---|---|---|---|
| १ | नेसरी | ६९९३ | ३४३५ | ३४५८ |
| २ | अर्जुनवाडी | १७१३ | ८२६ | ८८७ |
| ३ | हेळेवाडी-शिप्पूर तर्फ नेसरी | ३६३+९७३=१३३६ | १८६+४४५=६३१ | १७६+५२८=७०४ |
| ४ | तारेवाडी | ६८८ | ३०८ | ३८० |
| ५ | तळेवाडी | ८३१ | ४०४ | ४२७ |
| ६ | बिद्रेवादी | ९२२ | ४२८ | ४९४ |
| ७ | सरोळी | १४२७ | ६६६ | ७६१ |
| ८ | कुमरी | १२७९ | ६१० | ६६९ |
| ९ | काळामवाडी | ८०० | ३८७ | ४१३ |
| १० | जांभूळवाडी | ५४२ | २३६ | ३०६ |
| ११ | बटकणंगले | २,१२९ | ९७३ | ११५६ |
| १२ | वाघराळी | १४११ | ६३४ | ७७७ |
| १३ | यमेहट्टी | ८४१ | ४२० | ४२१ |
| १४ | हेब्बाळ-जलद्याळ | १६५३ | ७४७ | ९०६ |
| १५ | सांबरे | २०४७ | १०२७ | १०२० |
| १६ | डोणेवाडी | ६३२ | ३२१ | ३११ |
| १७ | हडलगे | २२९७ | १०८८ | १२०९ |
| १८ | तावरेवाडी | ६०५ | २९४ | ३११ |

टेबल क्र. १ स्त्रोत- २०११ ची जनगणना

वरील सारणीवरून असे स्पष्ट होते कि, सर्वात जास्त लोकसंख्या नेसरी गावची असून सर्वात कमी लोकसंख्या जांभूळवाडी गावची आहे. निवडलेल्या गावांपैकी फक्त एके ठिकाणी हेळेवाडी -शिप्पूर तर्फ नेसरी ग्रुप ग्रामपंचायत आहे. १७ गावामध्ये पुरुषांपेक्षा महिलांची संख्या जास्त आहे, ही एक खूप समाधान देणारी बाब आहे. फक्त डोनेवाडी गावात पुरुषांची संख्या महिलापेक्षा जास्त आहे.

## ग्रामपंचायतीतील महिला सरपंचाची संख्या

| अनु.क्र. | ग्रामपंचायत | ग्रामपंचायत सदस्य संख्या | सरपंच | ग्रामपंचायत महिला सदस्य संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | नेसरी | १५ | महिला | ५ |
| २ | अर्जुनवाडी | ९ | पुरुष | ४ |
| ३ | हेळेवाडी-शिप्पूर तर्फ नेसरी | ७ | पुरुष | ४ |
| ४ | तारेवाडी | ७ | महिला | ४ |
| ५ | तळेवाडी | ७ | पुरुष | ३ |
| ६ | बिद्रेवादी | ७ | पुरुष | ४ |
| ७ | सरोळी | ७ | महिला | ३ |
| ८ | कुमरी | ७ | महिला | ३ |
| ९ | काळामवाडी | ७ | महिला | ३ |
| १० | जांभूळवाडी | ७ | महिला | ४ |
| ११ | बटकणंगले | ९ | पुरुष | ५ |
| १२ | वाघराळी | ७ | महिला | ३ |
| १३ | यमेहट्टी | ७ | महिला | ४ |
| १४ | हेब्बाळ-जलद्याळ | ८ | महिला | ५ |
| १५ | सांबरे | ९ | महिला | ६ |
| १६ | डोणेवाडी | ७ | पुरुष | ४ |
| १७ | हडलगे | ७ | महिला | ४ |
| १८ | तावरेवाडी | ७ | महिला | ४ |

टेबल क्र. २ स्त्रोत- प्राथमिक तथ्य संकलन

गडहिंग्लज तालुक्यातील निवडक १८ ग्रामपंचायतीचे अध्ययन केल्यास असे दिसेन येते कि निवडलेल्या ग्रामपंचायतीपैकी १२ ग्रामपंचायतीमध्ये महिला सरपंच पद भूषवत आहेत. तर उरलेल्या ६ ग्रामपंचायतीमध्ये पुरुष सरपंचपद भूषवत आहेत. म्हणजेच महिला सरपंचाची संख्या पुरुष सरपंचापेक्षा जास्त असल्याचे दिसून येते. यावरून असा निष्कर्ष काढला जाऊ शकतो कि महिलांचा ग्रामपंचायतीतील सरपंच म्हणून सहभाग वाढला आहे.

त्याचबरोबर महिलांना आरक्षणाप्रमाणे सरपंचपद भूषवता येत आहे हे खालील तक्त्यावरून दिसून येईल.

## आरक्षणाप्रमाणे प्राप्त महिला सरपंचपद

| अनु.क्र. | ग्रामपंचायत | सरपंच | गट |
|---|---|---|---|
| १ | नेसरी | महिला | सर्वसाधारण |
| २ | अर्जुनवाडी | पुरुष | ओबीसी |
| ३ | हेळेवाडी-शिप्पूर तर्फ नेसरी (ग्रुप ग्रामपंचायत) | पुरुष | ओबीसी |
| ४ | तारेवाडी | महिला | सर्वसाधारण |
| ५ | तळेवाडी | पुरुष | सर्वसाधारण |
| ६ | बिद्रेवादी | पुरुष | ओबीसी |
| ७ | सरोळी | महिला | एस.सी. |
| ८ | कुमरी | महिला | सर्वसाधारण |
| ९ | काळामवाडी | महिला | सर्वसाधारण |
| १० | जांभूळवाडी | महिला | सर्वसाधारण |
| ११ | बटकणंगले | पुरुष | ओबीसी |
| १२ | वाघराळी | महिला | सर्वसाधारण |
| १३ | यमेहट्टी | महिला | सर्वसाधारण |
| १४ | हेब्बाळ-जलद्याळ | महिला | सर्वसाधारण |
| १५ | सांबरे | महिला | सर्वसाधारण |
| १६ | डोणेवाडी | पुरुष | ओबीसी |
| १७ | हडलगे | महिला | सर्वसाधारण |
| १८ | तावरेवाडी | महिला | सर्वसाधारण |

टेबल क्र. ३ स्त्रोत - प्राथमिक तथ्य संकलन

वरील तक्त्यावरून असे दिसून येते कि सरपंच पद भूषवताना आरक्षणाप्रमाणे महिलांना सरपंच पदाचा मान मिळाला आहे. एकूण १८ ग्रामपंचायती पैकी १० ग्रामपंचायतीमध्ये महिला सरपंच आहेत. त्यापैकी ८ गावात महिला सरपंचपद सर्वसाधारण गटातून जनतेद्वारे निवडले गेले आहे. तर केवळ १ महिला सरपंच अनुसूचित जातिमधून सरपंचपद भूषवित आहे. एवढेच नाही तर काही गावात गावकऱ्यांनी महिलांना ग्रामपंचायतीत जाणीवपूर्वक प्रतिनिधित्व दिले आहे.

महिलांचा अलीकडच्या काळात ग्रामपंचायतीमधील प्रवेश खुप्च समाधानकारक आहे. त्यातच आरक्षणामुळे त्यांना राजकारणाची दारे खुली झाली आहेत. घरदार सांभाळून त्या राजकारण करताना दिसत आहेत. भलेही त्या अजून फारश्या परिपक्व नसतील मात्र हि त्यांच्या स्वातंत्र्याची, राजकीय प्रवेशाची सोनेरी सकाळ ठरली आहे. ग्रामपंचायतीमधील महिलांचा वावर, त्यांची कार्यक्षमता निश्चितच दाखल घेण्याजोगी आहे. घरदार, शेती, आणि इतर सामाजिक जीवन सांभाळून त्या यशस्वीपणे राजकीय वर्तुळात आपला ठसा उमटवत आहेत. महिला सरपंचाबरोबरच ग्रामपंचायतीमधील महिला सदस्यांचे संख्याबळ पाहणे क्रमप्राप्त ठरते.

## निवडक ग्रामपंचायतीमधील महिला सदस्यांचे संख्याबळ

| अनु. क्र | ग्रामपंचायत | ग्रामपंचायत महिला सदस्य संख्या | गट |
|---|---|---|---|
| १ | नेसरी | ५ | सर्वसाधारण-४, ओबीसी-१ |
| २ | अर्जुनवाडी | ४ | सर्वसाधारण-३, ओबीसी-१ |
| ३ | हेळेवाडी-शिप्पूर तर्फ नेसरी (ग्रुप ग्रामपंचायत) | ४ | सर्वसाधारण-३, ओबीसी-१ |
| ४ | तारेवाडी | ४ | सर्वसाधारण-३, ओबीसी-१ |
| ५ | तळेवाडी | ३ | सर्वसाधारण-२, ओबीसी-१ |
| ६ | बिद्रेवादी | ४ | सर्वसाधारण-२, ओबीसी-२ |
| ७ | सरोळी | ३ | सर्वसाधारण-२, एस.सी.-१ |
| ८ | कुमरी | ३ | सर्वसाधारण-३ |
| ९ | काळामवाडी | ३ | सर्वसाधारण-१, एस.सी.-१, ओबीसी-१ |
| १० | जांभूळवाडी | ४ | सर्वसाधारण-३, व्ही.जे.एन.टी-१ |
| ११ | बटकणंगले | ५ | सर्वसाधारण-४, ओबीसी-१ |
| १२ | वाघराळी | ३ | सर्वसाधारण-३ |
| १३ | यमेहट्टी | ४ | सर्वसाधारण-३, ओबीसी-१ |
| १४ | हेब्बाळ-जलद्याळ | ५ | सर्वसाधारण-३, ओबीसी-२ |
| १५ | सांबरे | ६ | सर्वसाधारण-४, अ.जा.-१, ओबीसी-१ |
| १६ | डोणेवाडी | ४ | सर्वसाधारण-३, ओबीसी-१(रिक्त)* |
| १७ | हडलगे | ५ | सर्वसाधारण-४, अ.जा-१ |
| १८ | तावरेवाडी | ४ | सर्वसाधारण-४ |

टेबल क. ४

स्त्रोत- प्राथमिक तथ्य संकलन

वरील टेबलवरून लक्षात येते कि, निवडलेल्या १८ ग्रामपंचायतीमध्ये महिलांना योग्य ते आरक्षणानुसार प्रवेश मिळाला आहे. सर्वसाधारण, ओबीसी, अनुसूचित जाति, अनुसूचित जमाती अशा सर्व स्तरातील महिलांना राजकीय प्रवेश मिळाला आहे. प्राप्त परिस्थिती आणि प्राप्त आरक्षण यानुसार महिला राजकीय क्षेत्रात प्रवेश करत आहेत. *तक्ता नं. २ व ३ चे काळजीपूर्वक निरीक्षण केले असता निवडलेल्या ग्रामपंचायतीत महिलांना योग्य ते संख्याबळ मिळाले आहे.*

## दृष्टीक्षेपात महिला सरपंच व महिला सदस्यांचे संख्याबळ

| निवडलेली एकूण गावे | महिला सरपंचाची संख्या | एकूण महिला सदस्यांची संख्या |
|---|---|---|
| १८ | १२ | ७३ |

ग्रामपंचायतीतील महिलांचे आरक्षण व संख्याबळ पाहण्याबरोबरच त्यांची शैक्षणिक गुणवत्ता पाहणे आवश्यक ठरते. एखाद्या महिला सरपंचाचे गावासाठीचे योगदान हे तिच्या शैक्षणिक गुणवत्तेवरून ठरत नाही. ती कितीही शिकलेली असुदेत, तिला व्यवस्थापन व्यवस्थित जमते. शैक्षिणिक गुणवत्तेमुळे त्यांना कमी लेखणे हे खूपच चुकीचे आहे.

## महिला सरपंचाची शैक्षणिक गुणवत्ता

| अ. क्र. | शैक्षणिक गुणवत्ता | एकूण संख्या |
|---|---|---|
| १ | प्राथमिक शिक्षण | ----- |
| २ | माध्यमिक शिक्षण | ८ |
| ३ | उच्च माध्यमिक शिक्षण | ३ |
| ४ | उच्च महाविद्यालयीन शिक्षण | १ |

टेबल क्र. ५ स्त्रोत- प्राथमिक तथ्य संकलन

वरील तक्त्यावरून असा निष्कर्ष काढता येईल कि प्राथमिक शिक्षण घेतलेल्या महिलांचे प्रमाण शून्य आहे तर माध्यमिक शिक्षण घेतलेल्या महिलांचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ८ इतके आहे. उच्च माध्यमिक शिक्षण शिक्षण घेत्रलेल्या महिला सरपंचाची संख्या ३ तर महाविद्यालयीन शिक्षण घेतलेली महिला सरपंच केवळ १ असल्याचे आढळून आले आहे.  पण वर सांगितल्याप्रमाणे शैक्षणिक गुणवत्तेवरून महिलांची राजकीय कार्यशक्ती ठरवणे चुकीचे आहे. आपल्या कुटुंबात आपली आई फारशी शिकलेली नसली तरीही तिचे कौटुंबिक नियोजन शिकलेल्या व्यक्तीपेक्षाही सरस आणि अचूक असते. त्याचप्रमाणे एखादे गाव हि कुटुंबाप्रमाणेच असते.

## ग्रामपंचायत महिला सदस्यांची भूमिका आणि ग्रामविकासातील अडथळे

प्रत्येक ग्रामपंचायतीसमोर काही न काही प्रश्न असतातच तसेच ते प्रश्न समान स्वरूपाचेही असू शकतात. मात्र त्याची तीव्रता व संख्या भिन्न भिन्न असू शकते. जसे प्रश्न तसे आव्हानेही ग्रामपंचायतीसमोर आहेत. असे प्रश्न सोडवताना पुरुष सरपंचाना फारश्या संकटाना सामोरे जावे लागत नाही, मात्र स्त्रियांना अनेक समस्या व संकटाना सामोरे जावे लागते. बऱ्याचदा ज्या ग्रामपंचायतीमध्ये महिला सरपंच आहेत, तिथला कारभार त्यांचे पती तरी पाहतात किंवा पुरुष उपसरपंच कारभार पाहताना दिसून येतात. याविषयी फारशी कोणी चर्चा केली नाही मात्र हे उघड गुपित असल्याचे सांगितले जाते. याठिकाणी महिला सरपंचपद भूषवत असलेल्या ग्रामपंचायतीसमोरील प्रश्न आणि आव्हाने पुढीलप्रमाणे पाहता येतील..

## अंतर्गत व बहिर्गत रस्ते

बहुतेक सर्व गावे बहिर्गत रस्त्यांनी जोडले आहेत. हे रस्ते पक्या सडकानी बनले आहेत. रस्ते अरुंद असले तरीही वाहतुकीसाठी पुरेसे वाटतात. कारण अश्या गावांना जोडणारे रस्त्यावरून फारशी अवजड वाहतूक हो नाही तसेच गाड्यांची वर्दळी खूप कमी असते. एक मात्र खरे कि गावांना जोडणारे रस्ते अरुंद आहेतच तसेच रस्ता खराब झाला किंवा त्यावर खड्डे पडले कि त्यांची दुरुस्ती तत्काळ केली जात नाही. बऱ्याच काळाच्या प्रतीक्षेनंतर त्याकडे शासनाचे लक्ष जाते. ८०% गावांचे रस्ते 'प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजनेतून' निर्माण झाले आहेत. गडहिंग्लज ते चंदगड या तालुक्यांना जोडणारा राज्यमार्ग मार्ग मोठा असून या मार्गावर बटकणंगले, शिप्पूर, नेसरी, तळेवाडी अर्जुनवाडी तिट्टा येत असल्याने हे रस्ते मोठे आहेत. अशा रस्त्यावर वाहनांची वर्दळही मोठी असते.

अंतर्गत रस्ते म्हणजे गल्याना जोडणारे रस्ते शासनाच्या योजनेतून, निधीतून निर्माण झालेले असतात. हे रस्ते सिमेंटचे कॉन्क्रेटचे बनलेले असतात. हे रस्ते फारकाळ टिकत नाहीत. कारण एकतर हे रस्ते मजबूत बनवलेलेनसतात आणि दुसरे म्हणजे त्याची फारशी देखभाल करणे म्हत्वाचे मानले जात नाही. एकदा असे रस्ते बनवले कि ते पूर्ण उखडून जाईपर्यंत त्यकडे पहिले जात नाही. अशा रस्त्यांच्या देखभालीसाठी कसलाही निधी उपलब्ध नसतो. परिणामी ग्रामपंचायत निवडणूक लागल्यावर उमेदवाराकडून नवीन रस्ते बनवण्याचे आश्वासन दिले जाते, मात्र ते पूर्ण केले जातातच असे नाही. गावकर्यानी मागणी केल्यास सरपंचासमोर त्यासाठी निधी उपलब्ध करण्याचे मोठे संकट असते. पंचायत समितीच्या व जिल्हा परिषदेच्या त्यांना अनेक चकरा माराव्या लागतात. गावकऱ्याकडून जेव्हा त्यबाबत विचारणा होते तेव्हा प्रत्यन सुरु आहेत, निधी उपलब्ध नाही, लवकरच होणार आहेत अशी उत्तरे द्यावी लागतात. गावच्या कामासाठी, विकासासाठी, तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी वारंवार चकरा माराव्या लागतात. महिला सदस्य किंवा महिला सरपंचाना घरातली कामे आवरून, बऱ्याचदा शेती सांभाळून तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी चकरा मारणे शक्य होत नाही. परिणामी जनतेचा त्यांच्यावरचा विश्वास ढळू लागतो. काम वेळेत होत नसेल तर पुढच्या वेळेस लोकांसमोर काय तोंड घेऊन जायचे हा प्रश्न त्यांना सतावतो.

## गटारी आणि सांडपाणी

हि ग्रामीण भागातली सर्वत्र आढळणारी सर्वसाधारण समस्या आहे. बहुतेक ग्रामपंचायतीमध्ये सफाई कामगार नसल्याचे दिसून आले आहे. तर काही ठिकाणी पाणीपुरवठा करण्यासाठी तसेच ग्रामपंचायतीची स्वच्छता करण्यासाठी रोजंदारीवर कामगार ठेवलेले असतात. तसेच काही ठिकाणी ते कंत्राटी पद्धतीने कामावर असल्याचे दिसून आले आहे. त्यांचा पगार ग्रामपंचायतीना स्वखर्चाने द्यावा लागतो. त्यामुळे ग्रामीण भागात अस्वच्छतेचे वातावरण दिसून येते. रस्ते झडलेले नसतात. गावात गटारी असतात पण त्यातील कचरा व घन कधीच काढली जात नाही. पावसाळ्यात पाण्याबरोबर ते वाहून जातात. मात्र गटारी तुंबलेल्या असल्याने घाण पाणी साचणे, दुर्गंदी पसरणे, रोगराई पसरणे ई. समस्या दिसून येतात. काही काही गावात तर गटारी असूनही त्यांची अवस्था नसल्यासारखी आहे. केवळ दुरुस्ती व देखभाल नसल्याने तसेच त्यासाठी विशेष निधी नसल्याने ग्रामपंचायती समोर मोठा प्रश्न निर्माण होतो. लोकही गटारी स्वच्छ ठेवण्याकडे फारसे लक्ष देत नाहीत. कचऱ्याची विल्हेवाट व्यवस्थित न लावता तो बऱ्याचदा गटारीत टाकला जातो. धुणे-भांडी, आंघोळीचे पाणी गटारीत सर्रास सोडले जाते. मात्र ते गटार स्वच्छ करण्याबाबत लोक कमालीचे उदासीन असल्याचे दिसून आले आहे. शोषखड्डे फारसे दिसून येत नाहीत. काही महिला सदस्यांच्या घरासमोरच गटार नसल्याचे पाहणीत दिसून आले आहे.

## पिण्याच्या पाणी

स्वच्छ पिण्याचे पाणी हा नागरिकांचा अधिकार आहे तसेच पाण्याची व्यवस्था करणे हे ग्रामपंचायतीचे कर्तव्य आहे. ग्रामीण भागात पाण्याचे मुख्य स्त्रोत म्हणजे विहीर, ओढा, तलाव, बोअरवेल, आणि नदी हे आहेत. निवडलेल्या गावांपैकी जांभूळ वाडी गावात विहिरीचे पाणी मोठ्या टाकीत आणि मग ते पाणी गावाला पुरवले जाते. तर बटकणंगले, शिप्पूर, वाघराळी, बिद्रेवादी या गावांना विहीर, तारओहोळ, बोअरवेल, यातून पाणी पुरवठा होतो. तर इतर गावांना नदी, बोअरवेल याद्वारे पाणी पुरवठा होतो. असे पाणी फिल्टर केलेले नसते तर त्यात TCL टाकून ते पाणी पुरवठा केला जातो.. क्वचित प्रसंगी, म्हणजे, मोटरबंद पडल्यास, दुरुस्तीला दिल्यास किंवा काही बिघाड झाल्यास पाण्याची तात्पुरती व्यवस्था केली जाते. आजहि काही गावातील महिला व पुरुष कपडे धुनेसाठी, गुरांना अंघोळीसाठी, पोहण्यासाठी तारओहोळ, नदी, ओढा यांचा आधार घेतात. बहुतेक सर्व गावांना पाण्याची उत्तम व्यवस्था असल्याचे दिसून आले आहे. पाणी उपलब्ध नसल्यास त्याची विचारणा सरपंच व सदस्यांना केली जाते. बऱ्याचदा सरपंच व सदस्य वेळ मारून नेण्यासाठी काहीतरी उत्तरे देत असल्याचे गावकरी सांगतात.

## आरोग्यविषयक अडथळे

आरोग्यविषयक जनजागृती हा हि ग्रामीण भागातील महत्वाचा मुद्दा आहे. गटारीची व्यवस्था नसणे, असल्या तरी त्या स्वच्छ नसणे, कचऱ्याची विल्हेवाट व्यवस्थित न लावणे, पिण्याचे स्वच्छ पाणी नसणे, स्वच्छ रस्ते नसणे, शौचालयाचा वापर न करणे, वैयक्तिक स्वच्छता नसणे, त्यातून आजार जडणे अशा आरोग्यविषयक समस्या गावात पाहायला मिळतात. ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने स्वच्चतेविषयी अनेक मोहिमा राबवल्या जातात. त्यात सरपंच व ग्रामपंचायत सदस्य हिरीरीने भाग घेतात. आपले गाव सुंदर व स्वच्छ ठेवण्यासाठी लोकांना प्रोत्साहित करतात. त्यासाठी गावसभेत तसेच मोक्याच्या प्रसंगी आणि शासनाचा आदेश आल्यावर तसे निर्णय घेतले जातात. काही काळाकरिता रस्ते, गटारी, वैयक्तिक स्वच्छता याकडे लक्षही दिले जाते मात्र त्यानंतर ये रे माझ्या मागल्या अशीच गावाची अवस्था होते. महिला सरपंच व महिला सदस्य यांच्या सांगण्याकडे फारसे गांभीर्याने लक्ष देले जात नाही. आजारी पडल्यास दवाखान्यात जाण्यापेक्षा आजार अंगावर काढणे, मनाने औषधं घेणे, देव-देव करणे, घरगुती इलाज करणे ई. गोष्टी आजही लोक करत असल्याचे पाहणीत निदर्शनास आले आहे. आजार फारच जास्त झाल्यास दवाखाना गाठला जातो. नेसरीसारखे एखादे गाव सोडल्यास इतरत्र कोठेही घंटागाडी दिसून आली नाही. त्यामुळे कचऱ्याची विल्हेवाट व्यवस्थित लावली जात नाही.

## डिजिटल बोर्ड/फ्लेक्स

गावात कोणत्याही प्रकारचा कार्यक्रम असो, तिथे आता शहराप्रमाणेच डिजिटल बोर्डाने प्रवेश केला आहे. ग्रामपंचायत निवडणूक असो, संघाची निवडणूक असो, एखाद्या मंडळाची निवडणूक असो, नेत्यांच्या जयंत्या-मयंत्या असो, भजन कार्यक्रम असो, वाढदिवस असो, कोणताही धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रम असो, महत्वाच्या जागी आता असे बोर्ड लावले जात आहेत. शहराच्या सौंदर्यास ज्याप्रमाणे अशा बोर्डाने विद्रूप केले आहे, त्याचप्रमाणे गावाचेही सौंदर्य विद्रूप होत आहे कि काय असा प्रश्न होतो आहे. गावास एखादा निधी मंजू झाला किंवा एखाद्या योजनेचे उद्घाटन करायचे असल्यास मोठे मोठे फ्लेक्स लावले जातात. असे बोर्ड किती दिवस ठेवायचे याचा अवधी ठरलेला असला तरी अनेक दिवस ते बोर्ड तसेच लटकलेल्या स्वरुपात दिसतात. असे बोर्ड लावण्यापासून ग्रामपंचायतीला उत्पन्न मिळत असले तरी ते अतिशय तुटपुंजे असते असे सर्वच महिला सरपंच सांगतात. काही काही गावात तर त्यासाठी ग्रामपंचायत पैसेही आकारत नाही. नेसरी गावात मोठ्या प्रमाणात बसथांब्याच्या परिसरात असे फ्लेक्स कायम स्वरूपी पाहायला मिळतात. फ्लेक्स लावण्यावरूनही गावात भांडणे होत असल्याचे ऐकायला मिळते.

## लिंगभेद व जातीभेद

घटनेने लिंगभेद व जातीभेद केव्हाच हद्दपार केले आहे. पण ग्रामीण भागात अजूनही लिंगभेद व काही प्रमाणात जातीभेद पाहायला मिळतो. मुलींना ग्रामीण भागात लिंगभेदाचा सामना करावाच लागतो आहे. आजही तिची आवड-निवड लक्षात घेतली जात नाही. तीच स्थिती ग्रामपंचायत निवडणूक व निवडून आल्यावर महिला सरपंच व महिला सदस्यांच्या बाबतीत पाहायला मिळते. निवडून आलेल्या महिला सरपंचापैकी फक्त १% महिला या उच्च शिक्षित आहेत. तर महिला सदस्यापैकी फक्त ५% महिला या उच्च माध्यमिक शिक्षित आहेत. उरलेल्या महिलांनी फक्त माध्यमिक शिक्षण पूर्ण केले आहे. ज्याठिकाणी महिला सरपंच आहेत त्याठिकाणी त्यांचे पती गावचा कारभार चालवताना दिसून येतात. तीच अवस्था महिला ग्रामपंचायत सदस्यांची आहे. काही ठिकाणी तर पुरुष उपसरपंच आहेत त्या ठिकाणी ग्रामपंचायतीचा कारभार तेच पाहतात. महिला सरपंच व सदस्यांकडून त्याबद्दल माहिती घेतली असता त्यांनी या गोष्टीचे खंडन केले. याबाबत उघड कोणी सांगत नाहीत पण गावकऱ्यांशी केलेल्या चर्चातून या गोष्टीची माहिती मिळते. ज्या ठिकाणी आरक्षणातून महिला सदस्य निवडून आल्या आहेत त्यांना *जातीभेदास सामोरे जावे लागत असल्याचे तसेच लिंगभेदाला सामोरे जावे लागते.* काही महिला सदस्यांनी हि गोष्ट केवळ मानेने होकार देत मान्य केली आहे. यात प्रामुख्याने त्यांचे म्हणणे न ऐकणे, पुरेसा निधी त्यांच्या प्रभागास उपलब्ध करून न देणे, त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे अशा समस्यांना त्यांना सामोरे जावे लागत असल्याचे त्यांनी मान्य केले आहे.

## वृक्ष लागवड व संवर्धन

शासनाची वृक्ष लागवड किंवा वृक्ष संवर्धनासंदर्भात कोणतीही योजना असो, सुरवातीला त्यची जोरदार तयारी करून वृक्षावरोपण केले जाते, त्याचे फ्लेक्स झळकतात, फोटो सेशन होतात, पेपरला बातमी दिली जाते. सुरवातीला रोपाभोवती कुंपण केले जाते. असे चित्र रस्त्याच्या दुतर्फा पाहायला मिळते. पण काही कालावधीनंतर मात्र त्याकडे दुर्लक्ष केले जाते. केलेले कुंपण मोडून पडते. मग मोकाट जनावरे रोपे खून टाकतात. परत त्याचजागी दुसऱ्यावर्षी वृक्षावरोपण केले जाते. फक्त २०% ग्रामपंचायतीनी वृक्षावारोपानंतर त्याची जोपासना केली आहे. गावकरीही वृक्षांची जोपासना करणे आपली जबाबदारी नसून ग्रामपंचायतीची जबादारी आहे असे मानून त्याकडे दुर्लक्ष करतात. बऱ्याच ठिकाणी पाण्याच्या अपुरवठ्यामुळे झाडे जाळून गेली आहेत तर काही ठिकाणी अशी झाडे कोणीतरी उपसून नेल्याचे गावकरी सांगतात आणि प्रत्यक्षपणे पाहणीत आढळून आले आहे.

## ग्रामविकासासाठी निधींची उणीव

घरफाळा (घरपट्टी), पाणीपट्टी आणि इतर विविध मार्गांनी ग्रामपंचायतीस निधी मिळत असतो. शासनाच्या विविध योजना गावात राबवण्यासाठी त्यांना निधी प्राप्त होतो. गावास आलेला निधी हा गावाच्या विकासाठी खर्च होणे गरजेचे आहे. तसा खर्च होतोही. गावात डांबरीकरण, सिमेंटचे रस्ते, सार्वजनिक नळ, पाण्याची व्यवस्था, खांबावरील लाईट बसवणे व दुरुस्ती, दलित वस्ती सुधार, घरकुल, शौचालय बांधणी, आरोग्य ई. साठी राज्य व केंद्र सरकारकडून निधी उपलब्ध होतो. बऱ्याचदा हा निधी वेळेत मिळत नाही, मिळाला तर अत्यल्प, कमी निधी मिळतो, किंवा मिळतच नाही. असा निधी मिळवण्यासाठी तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी चकरा माराव्या लागतात. बऱ्याचदा हे महिला सरपंचाना शक्य होत नाही तेव्हा पुरुष उपसरपंच किंवा पुरुष सदस्य हि कामे करताना दिसून आली आहेत. बऱ्याचदा इच्छा असूनही महिला सरपंचाना गावात काही विकासाच्या गोष्टी राबवता इतर नाहीत. तीच अवस्था महिला सदस्यांची असल्याचे त्या मान्य करतात. वरील विवेचनावरून असे दिसून येते कि *अपुऱ्या निधीमुळे महिला सरपंच व महिला सदस्यांना विकास कामात अडचणी येतात.* काही विकास कामासाठी गावातून निधी गोळा केला जातो.

## गावसभा/ग्रामसभा

ग्रामसभा हि ग्रामपंचायतीची परीक्षाच म्हणावी लागेल. कारण आपण केलेल्या कार्याचा लेखाजोखा जनतेसमोर मांडावा लागतो. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ७ व सभा नियम १९५९ प्रमाणे ग्रामपंचायतीला ग्रामसभा घ्याव्या लागतात. ग्रामसभांच्या संदर्भात बैठक नियम १९५९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे किमान चार ग्रामसभा घेणे आवश्यक आहे. मात्र कलम ७ (१) मधील तरतुदीनुसार दोन ग्रामसभांमधील अंतर ४ महिन्यांपेक्षा अधिक असता कामा नये. याशिवाय आवश्यकतेनुसार चारपेक्षा जादा ग्रामसभा आयोजित करण्याचा अधिकार सरपंच व ग्रामसेवकांना आहे.

## विशेष ग्रामसभा

ग्रामस्थांनी अथवा ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी अथवा जिल्हा परिषद व पंचायत समितीने लेखी मागणी केल्यास ग्रामपंचायतीच्या वतीने विशेष ग्रामसभेचे आयोजन केले जाते. या सभा कधी व केव्हा, किती घ्यावयाच्या यांचे बंधन ग्रामपंचायतीला नाही, मात्र महाराष्ट्र ग्रामपंचायत नियम १९५९ च्या पोटनियम ३ नुसार प्रत्येक वित्तीय वर्षातील ग्रामसभेची पहिली सभा त्या वर्षाच्या सुरवातीनंतर दोन महिन्यांच्या आत भरविणे गरजेचे आहे. १५ ऑगस्ट, २ ऑक्टोबर व २६ जानेवारीला ग्रामसभा घेणे ग्रामपंचायतीच्या सरपंच व ग्रामसेवकांकावर बंधनकारक आहे.

## निष्कर्ष

वरील विश्लेषणावरून पुढील निष्कर्ष काढता येतात.

१. ग्रामपंचायतीवर महिला सरपंचाचे वर्चस्व दिसून येत आहे.

२. शासनाच्या आरक्षणानुसार ग्रामपंचायतीमध्ये महिलांना आरक्षण दिले जाते. लोकसंख्येच्या प्रमाणात महिलांना आणि मागास्वर्गीयाना आरक्षण दिले जाते.

३. अनेक प्रकारच्या समस्या ग्रामपंचायतीसमोर उभ्या टाकल्या आहेत.

४. शासनाकडून पुरेसा निधी मिळवण्यासाठी ग्रामपंचायती धडपडत असतात.

५. महिला सरपंच व महिला सदस्यांना पुरुष सरपंच व पुरुष सदस्यापेक्षा जास्त अडचणींना सामोरे जावे लागते.

६. अनेक गावाची कामे जसे, घरकुल, शौचालय, स्वच्छ पाणी, अंतर्गत रस्ते, आजही शासकीय निधीच्या प्रतीक्षेत आहेत.

७. महिला अतिशय जिद्दी व चिकाटीने ग्रामपंचायतीमध्ये आपली भूमिका व काम करताना दिसून येतात..

८. स्वच्छता व आरोग्य या बाबतीत गावात फारसी जनजागृती दिसून येत नाही.

९. गावसभा किंवा ग्रामसभा नियमितपणे गावात घेतल्या जातात. त्यातील निर्णय ग्रामस्थांना मान्य असतात.

१०. सरपंचपद व सदस्यपद भूषविताना महिलांच्याप्रती एक वेगळाच आनंद, उत्साह व विश्वास दिसून येतो.

## ग्रामसभेचा कोरम

ग्रामपंचायतीने आयोजित केलेल्या ग्रामसभेसाठी ग्रामपंचायतीच्या कायद्यातील १९५९ च्या पोटनियम १० नुसार मतदार यादीत समाविष्ट असलेल्या एकूण मतदार संख्येच्या १५ टक्के किंवा १०० मतदार यापैकी जी संख्या कमी असेल, तेवढ्या ग्रामस्थांची उपस्थिती आवश्यक असते. आवश्यक गणपूर्ती नसेल, तर ग्रामसभा तहकूब केली जाते. तहकूब ग्रामसभा पुन्हा आयोजित केल्यानंतर त्या ग्रामसभेस मात्र गणपूर्तीचे बंधन नसते; मात्र पूर्वीच्या सूचनापत्रावरील विषयांवरच या ग्रामसभेत चर्चा केली जाते. निवडलेल्या १८ गावात नियमितपणे ग्रामसभा घेतल्या जातात. महिला सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व गावकर्यांनीही त्यास दुजोरा दिला आहे. मात्र बऱ्याचदा गावातील सर्वच ग्रामस्थ उपस्थित राहत नाहीत. महिलांची संख्या तर अतिशय तुटपुंजी असते. तसेच काही गावामध्ये महिला सरपंच व महिला सदस्या एवढ्याच महिला ग्रामसभेला पाहायला मिळतात. काही सरपंच व महिला सदस्यांनी गावकरी फक्त ग्रामसभेला चहापाणी पिण्यासच येतात असे भाष्य केले आहे. गावकऱ्यांनी प्रश्न विचारल्यास पन्ना टक्के महिला सरपंचाना उत्तरे देता येत नाहीत किंवा त्यांना त्यातले फारसे काही माहित नसते असे ग्रामस्थांशी चर्चा केल्यानंतर समजते. महिला सदस्यांची स्थिती यापेक्षा फारशी वेगळी नाही. गावसभा तहकूब करून परत गावसभा घेण्याची वेळ मात्र एकाही ग्रामपंचायतीवर आलेली नाही असे अभ्यासांती दिसून आले आहे.

## समारोप

ग्रामपंचायत हि महिला राजकारणाची पहिली पायरी मानली जाते. ग्रामीण भागातील महिला या ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आपली नवीन ओळख निर्माण करत आहेत. मात्र या नवीन ओळखीत त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते आहे. घरदार सांभाळून, लोकांच्या वाईट नजरापासून स्वतःचा बचाव करत, नवीन ओळखी आणि नाती सांभाळत ग्रामीण राजकारणात सक्रीय होत आहेत. ग्रामीण भागात हेवा, मत्सर, द्वेष निवडणुकीच्या वेळी मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतो. यातूनच गावात असलेले सौहार्दपूर्ण वातावरण काहीकाळ का असेना तणावग्रस्त बनते. महिलांना तर अशा गोष्टींची फारशी सवय नसते. त्यामुळे गावासाठी काम करताना त्यांची मानसिकता बऱ्याचदा चांगली राहत नाही. शिवाय जाति-पातीचा प्रश्न, ग्रामपंचायतीतील असलेले पुरुषी वर्चस्व, गावाच्या विकासात बाधा आणणारे घटक, आर्थिक निधींची चणचण, गावातील अनेक प्रश्न सोडवताना झालेली दमछाक, विकास कामे झाली नाहीत तर पुढील निवडणुकीचा निर्माण होणारा प्रश्न, कौटुंबिक जबाबदारी, सामाजिक भान व जबाबदारी, अशा कितीतरी समस्यांना महिलांना सामोरे जावे लागते. त्यातूनही त्या स्वतःला सावरत, मार्ग काढत, गावचे प्रश्न सोडवत मार्गक्रमण करत आहेत. पुढील निवडणुकीत आपण निवडून येऊ कि नाही हे माहित नाही परंतु ग्रामपंचायतीत काम करण्याची संधी व जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी आणि ग्रामविकासासाठी केलेली धडपड याचे एक आत्मिक सुख मिळते अशी भावना महिला सरपंच व महिला सदस्य यांनी व्यक्त केली आहे. एकंदरीत महिला सरपंच व ग्रामपंचायत महिला सदस्य यांच्या पुढे अनेक प्रश्न, समस्या व आव्हाने असले तरी त्या त्यातून मार्ग काढत एक शक्तिशाली भारत निर्माण करण्यात त्यांचे मोलाचे योगदान असणार आहे हे मात्र निश्चित.

T. K. Kolekar Arts & Commerce College, Nesari
Estd 1995
Gadhinglaj

## संदर्भग्रंथ


- महाराष्ट्र जमीन महसूल नियम पुस्तिका, संकलन, राजेश चौधरी, चौधरी लॉ पब्लिशर्स पुणे.
- ग्रामीण समाजशास्त्र- गुरुनाथ नाडगोंडे
- भारतीय समाजशास्त्र - जैन लवानिया
- भारतीय समाज- ए. वाय. कोंडेकर
- ग्रामीण समाजशास्त्र व सामुदायिक विकास- प्रा. रा. ना. घाटोळे
- सामाजिक संशोधन पद्धती- बोधनकर, अलोणी, कुलकर्णी
- सामाजिक संशोधन पद्धती- डॉ. सुनील मायी
- Rural sociology in India- Dr. A. R. Desai
- women and society in India, Desai Meera & Maithreyi Krishnaraj

Estd 1995
T. K. Kolekar Arts & Commerce College Nesari, Gadhinglaj

शिक्षण समिती क.।। नेसरीचे
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नित
( नॅक—B.मानांकित )
तुकाराम कृष्णाजी कोलेकर
कला आणि वाणिज्य महाविद्यालय नेसरी,
ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर ४१६५०४. ☎०२३२७—२७२५९१
शासन मान्यता क्रमांक : एनुजीसी ३५९५/नमवि/१३७/९५ मशि—३, दि.०४/०८/१९९५
E-mail-accnesari08@rediffmail.com Website-www.nesaricollege.com

| अध्यक्ष | प्राचार्य |
|---|---|
| मा.ॲड.एच.टी.कोलेकर (B.Sc LLB ) | डॉ.एस.बी.भांबर (M.A.,B.Ed,M.Phil.,Ph.D) |

जा.क./एसीएन/शशी/ /२०२२—२३ दि. २०/२/२०२३

# नोटीस

महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या सर्व विद्यार्थ्यांना व प्रगत विद्यार्थ्यांना (Advanced learner student) कळविण्यात येते की महाविद्यालयाच्या इतिहास विभाग मध्ये दिनांक २३ फेब्रुवारी, २०२३ रोजी सकाळी, ठीक ११.०० वाजता प्रा. प्रा. पालकर एस. पी.( छ.शिवाजी ज्यू. कॉलेज, नेसरी ) 'लघु उद्योगातून रोजगाराच्या संधी ' या विषयावर व्याख्यान होणार आहे. तेव्हा सर्वांनी वेळेत उपस्थित राहावे.

दि. २० /२/२०२३

नेसरी

Dr. Kolasekar M. S.

(Subject Teacher)

PRINCIPAL
Tukaram Krushnaji Kolekar
Arts & Commerce College Nesari
Tal- Gadhinglaj Dist-Kolhapur

T. K. KOLEKAR ARTS, COMMERCE AND SCIENCE COLLEGE, NESARI

## Teaching – Learning Process

**Guest Lecture – व्याख्यान**

दिनांक ( Date ) २३ फेब्रुवारी, २०२३ वेळ ( Time ) ११ .०० ते ११.३०

- **डॉ. कोळसेकर एम. एस. ( इतिहास विभाग प्रमुख )**
- **विषय ( Subject) :** लघु उद्योगातून रोजगाराच्या संधी **(Employment opportunities from small scale industries)**
- **कार्यक्रमाचे स्वरूप** ( Nature of the Programme ) : व्याख्यान ( lecture )
- **कार्यक्रमाचे अध्यक्ष** (Chairperson of the Programme ): डॉ. कोळसेकर एम. एस.
- **प्रमुख पाहुणे** (Chief Guest): प्रा. पालकर एस. पी.
- **उपस्थित विद्यार्थी व विद्यार्थिनी** ( Student Beneficiaries ) : २१ हून अधिक
- **कार्यक्रमाचा गोषवारा ( Brief Summary of the Programme) :**

इतिहास विभागा अंतर्गत २०२२-२३ या शैक्षणिक वर्षामध्ये दि. २३ फेब्रुवारी,२०२३ रोजी बी.ए.भाग तीन (इतिहास विभाग) व महाविद्यालयातील प्रगत विधार्थी

विषयाचे महत्व (Employment opportunities from small scale industries ) प्रा. पालकर एस. पी. **यांनी** 'लघु उद्योगातून रोजगाराच्या संधी' **या विषयावर व्याख्यान देऊन विध्यार्थ्यांशी चर्चा केली. त्यानंतर विध्यार्थ्यांनी आपली मते व्यक्त केली.** डॉ. कोळसेकर एम. एस. यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आभार (Vote of Thanks) हीने व्यक्त केले.





प्रा. पालकर एस. पी. 'लघु उद्योगातून रोजगाराच्या संधी' या विषयावर व्याख्यान झाले .

PRINCIPAL
Tukaram Krushnaji Koleka
Arts & Commerce College Ne:
Tal- Gadhinglaj. Dist-Kolhapu

तुकाराम कृष्णाजी कोलेकर कला , वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय नेसरी

T. K. KOLEKAR ARTS, COMMERCE AND SCIENCE COLLEGE, NESARI

## Teaching – Learning Process

## ( 2022-2023)

## अहवाल

इतिहास विभागा अंतर्गत २०२२–२३ या शैक्षणिक वर्षामध्ये दि. २३ फेब्रुवारी, २०२३ वेळ रोजी बी.ए.भाग तीन (इतिहास विभाग) व महाविद्यालयातील प्रगत विद्यार्थी यांचेसाठी लघु उद्योगातून रोजगाराच्या संधी (Employment opportunities from small scale industries) या विषयावर व्याख्यानातून मार्गदर्शन केले.

विषयाचे महत्व (Employment opportunities from small scale industries) . प्रा. पालकर एस. पी.( छ.शिवाजी ज्यू. कॉलेज, नेसरी ) 'लघु उद्योगातून रोजगाराच्या संधी या घटकावर व्याख्यान देऊन विध्यार्थ्यांशी चर्चा केली. लहान उद्योग शेतीपूरक कोणते , अर्थसहाय्य कोणत्या घटकाकडून प्राप्त होते. त्यातील अडचणी व मार्ग इ. मुद्द्यावर चर्चा केली. त्यानंतर विध्यार्थ्यांनी आपली मते व्यक्त केली. डॉ. कोळसेकर एम. एस. यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. एकूण २२ विद्यार्थी उपस्थीत होते . आभार प्रा. संगीता लोखंडे (Vote of Thanks) व्यक्त केले.

Dr. Kolasekar M. S.

(Subject Teacher)

PRINCIPAL

Tukaram Krushnaji Kolekar

Arts & Commerce College Nes

Tal- Gadhinglaj, Dist-Kolhapur

# अहवाल

महाविद्यालयातील विशेष उजाळा वर्गांतर्गत येणा-या विद्यार्थ्यांना कळविणेत येते की, शुक्रवार दि. 7 जानेवारी 2023 रोजी मौजे हुक्केरी येथे आगरबत्ती उद्योगास भेट देण्यासाठी घेवून गेलो. यावेळी विद्यार्थ्यांनी आगरबत्ती उद्योगाबाबतची सर्व माहिती पद्धतशीर समजून घेतली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन अत्यंत चांगली माहिती दिली. त्याबद्दल विद्यार्थ्यांनी त्यांचे आभार मानले.

समन्वयक
डॉ. ए. आर. कुंभार

PRINCIPAL
Tukaram Krushnaji Kolekar
Arts & Commerce College Nesari
Tal- Gadhinglaj. Dist-Kolhapur.

शिक्षण समिती [illegible] नेसरीचे

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नित

( नॅक- मानांकित )

# तुकाराम कृष्णाजी कोलेकर
# कला आणि वाणिज्य महाविद्यालय नेसरी,

ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर 416504 ☎ 02327-272591

शासन मान्यता क्रमांक : एनजीसी 3596 / नमवि / 137 / 95 मशि-3, दि.04 / 08 / 1995

E-mail: [illegible] Website: [illegible]

अध्यक्ष
मा.ॲड.एच.टी.कोलेकर (B.Sc. LLB.)

प्राचार्य
डॉ.एस. बी.भांबर (M.A. B.Ed.M.Phil.Ph.D)


दि. 5 जानेवारी 2023

## नोटीस

महाविद्यालयातील विशेष उजाळा वर्गातील विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, शुक्रवार दि. 7 जानेवारी 2023 रोजी सर्वांनी आगरबत्ती उद्योगाला भेट देण्यासाठी हुक्केरी येथे ठिक 11.00 वाजता जायचे आहे. तरी सर्वांनी वेळेत उपस्थित रहावे.

समन्वयक
डॉ. ए. आर. कुंभार

PRINCIPAL
Tukaram Krushnaji Kolekar
Arts & Commerce College Nesari
Tal- Gadhinglaj Dist-Kolhapur

## अगरबत्ती उद्योगास भेट

Estd
1995

